मा.मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त

**विषय:- महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम-१९७१ मधील कलम १३(१), १५-ए, ३३-ए व ३३-बी आणि ३५-(१ए) मध्ये सुधारणा करणेबाबत...**

दि.०८.०४.२०२५ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे:-

१. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम-१९७१ मधील कलम १३(१), १५-ए, ३३-ए व ३३-बी आणि ३५-(१ए) मध्ये सुधारणा करण्यासाठी विभागाने परिशिष्ट "क" येथे प्रस्तावित केलेल्या विधेयकाच्या मसुद्यास मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिली.
२. कलम १५-ए मध्ये "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण संयुक्त भागीदारी तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनेतील जमीन ३० वर्षांच्या भाडे करारावर संबंधित शासकीय / निमशासकीय संस्थांना देईल. सदर भाडेकराराचे दर ३० वर्षाच्या टप्प्याने नुतनीकरण करण्यात येईल." या सुधारणेसह मान्यता देण्यात आली.
३. विधी व न्याय विभागाच्या सल्लामसलतीने विधेयकाच्या प्रारुपामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.
४. सध्या विधानमंडळाचे अधिवेशन सुरु नसल्यामुळे इतिवृत्ताची वाट न पाहता प्रस्तावित सुधारणा करण्याकरिता विधेयकाऐवजी अध्यादेश काढण्यास मान्यता देण्यात आली.

**तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संदर्भात माननीय मंत्रिमंडळाने पुढीलप्रमाणे सुचना दिल्या आहेत. सदर सुचनांवर विभागाने अभ्यास करून उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.**

१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बाबतीते "Suo moto" रिट पिटीशन या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्रथम सर्व संबंधित लोकप्रतिनिधींचे अभिप्राय घ्यावेत तसेच लोकप्रतिनिधी सोबत बैठक घ्यावी.
२) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंतर्गत विकासकाची नियुक्ती करताना विकासकाच्या आर्थिक परिस्थिती बाबतचे परिशिष्ट-३ ची अधिक काटेकोरपणे तपासणी करावी.
३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत खासगी जमिनीचे भूसंपादन करताना खासगी जमीनीच्या मालकाचे अधिकाराचे संरक्षण व्हावे. त्याच्या जमिनीची मालकी निश्चित होईपर्यंत जमिनीचा

15/4/25

मोबदला कोणाला द्यावयाचा हे ठरेपर्यंत सदर रक्कम माननीय न्यायालयात डिपॉझिट म्हणून ठेवावी.

४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन घटक पूर्ण झाल्यानंतर पुनर्वसन घटकाची जमीन पुनर्वसन इमारतीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे ९० दिवसात भाडेकरार करुन निहीत करावी.

वल्सा नायर सिंह

(वल्सा नायर सिंह)
अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण)

मा.मुख्य सचिव